International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.8 No.3 Jan – Feb 2021

# नवीन कृषी कायदे आणि भारतीय कृषी क्षेत्रावरील संभाव्य परिणामांचा अभ्यास

**डॉ. सोमनाथ वसंतराव पाटील**

साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळेगाव ढमढेरे

**प्रस्तावना:**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे देशातील ६५ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीच्या विकासाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. देशातील प्रत्येक सरकार शेतीच्या आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न करताना दिसते स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनवण्याच्या हेतूने विशेष प्रयत्न सुरू झाले मात्र खऱ्या अर्थाने १९७० च्या दशकातील हरितक्रांतीने कृषी क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल झाले आणि शेती क्षेत्र एका नव्या जोमाने सर्वांगीण प्रगती करू लागले. हरितक्रांतीचा मुख्य भर हा शेतीची उत्पादकता वाढविणे यावर होता.

१९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. नवीन आर्थिक धोरण मधील जागतिकीकरण खाजगीकरण आणि उदारीकरणाचा प्रभाव शेती क्षेत्रावर देखील झाला आणि शेतीचे स्वरूप पूर्णतः बदलून गेले शेतीमध्ये स्पर्धात्मकता वाढली. शेतीची उत्पादकता वाढविण्याबरोबरच शेतमाल प्रक्रिया उद्योग शेतमाल पॅकिंग प्रक्रिया तसेच शेतमाल साठवणूक आणि शेतमाल निर्यात व्यवसायात प्रचंड वाढ होऊन नवीन संधी निर्माण झाल्या.

भारतीय शेती क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल करणारा आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे भारत सरकारने कृषी क्षेत्रतील बदलासंदर्भात आणलेले नवीन कृषी कायदे होय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं संसदेत पारित केलेल्या कृषी विधेयकांवर राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी २७ सप्टेंबर २०२० रोजी स्वाक्षरी केली आणि देश्यात नवीन कृषी कायदे लागू झाले. भारतातील कृषी क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणाऱ्या या कायद्यांचे सखोल विश्लेषण करणे आवश्यक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. नवीन कृषी कायदे आणि कायद्यातील तरतुदी अभ्यासने

२. नवीन कृषी कायद्यामधील तरतूदींचा कृषी क्षेत्रावरील संभाव्य परिणामांचा अभ्यास

**नवीन कृषी कायदे आणि कायद्यातील तरतुदी:**

**१. शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा २०२०:**

हा कायदा कृषीमालाच्या विक्रीसंबंधी तरतुदी करतो यामध्ये खालील प्रमुख तरतुदी काय आहेत.

१. कृषी उत्पन्न बाजार समितीने मान्यता दिलेल्या बाजारांबाहेरही मालाची खरेदी-विक्री.

२. इ-ट्रेडिंगसाठी व्यवस्था उपलब्ध करून देणे.

२. कृषीमालाच्या राज्यांतर्गत आणि आंतरराज्य हालचालीतील अडथळे दूर करणे.

४. मार्केटिंग आणि वाहतूक खर्च कमी करून शेतकऱ्यांना अधिक चांगली किंमत मिळवून देणे.

कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सहाय्य) विधेयक हे कृषी उत्पन्न बाजार समितीला पर्यायी व्यवस्था देण्यावर भर देत आहे.

**२. शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२०:**

हा कायदा कंत्राटी शेतीबद्दल असून शेतकऱ्यांना ते घेत असलेल्या पिकासाठी आगाऊ स्वरुपात करार करता येण्याची तरतूद यात केलेली आहे. भारतात सध्याही काही प्रमाणात अशाप्रकारची कंत्राटी शेती पाहायला मिळते. पण याला कायदेशीर स्वरूप देण्याचा हा प्रयत्न आहे.

१. आपल्या पिकासाठी घाऊक विक्रेते, प्रोसेसिंग इंडस्ट्री किंवा कंपन्यांशी करार करता येईल.

२. करारानुसार किंमतही ठरवता येईल.

३. 5 हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांना कंत्राटांचा फायदा होईल.

४. बाजारपेठेतल्या अस्थिरतेचा भार शेतकऱ्यांवर नाही त्यांच्या कंत्राटदारांवर राहील.

५. मध्यस्थांना दूर करून शेतकरी पूर्ण नफा मिळवू शकतात.

**३. अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा २०२०:**

अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) विधेयक हा तिसरा कायदा आहे

१. सरकारने अनेक कृषी उत्पादनं अत्यावश्यक वस्तूच्या यादीतून वगळण्याचा निर्णय घेतला.

२. डाळी, कडधान्यं, तेलबिया, कांदा, बटाटे यांना अत्यावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळले .

३. यामुळे ओरिय वस्तूंचा साठा करण्यावर निर्बंध राहणार नाहीत.

४. निर्बंध कमी झाल्याने परकीय गुंतवणूक तसंच खासगी गुंतवणूकदारांचा ओघ वाढेल.

५. किमती स्थिर राहण्यात मदत होईल. ग्राहक-शेतकरी दोघांचा फायदा.

या तिन्ही कायद्यांची वेगवेगळी विशेषता व वेगवेगळ्या तरतुदी आहेत. मात्र या कृषी कायद्यांचे भारतीय कृषी क्षेत्रावरील संभाव्य परिणाम अभ्यासने आवश्यक या सुधारणा विधेयकातून शेतकऱ्यांचे हित जपले जाईल का हे पाहने आवश्यक आहे.

**कृषी क्षेत्रावरील संभाव्य परिणाम:**

**शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा 2020:**

या विधेयकानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती व्यतिरिक्त पर्यायी व्यवस्था उभी करण्याचा हेतू आहे. या कायद्यानुसार शेतकऱ्यांना खुल्या बाजारात आपला शेतमाल कुठूनही (शेतातून), कुठेही (देशात व देशाबाहेर) व कोणालाही विकण्याचा अधिकार मिळाला आहे. शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार मिळाला आहे. या व्यतिरिक्त कृषी उत्पन्न बाजार समितीचा पर्याय देखील उपलब्ध असणार आहे. मात्र या नवीन कायद्यात काही बाबीत स्पष्टता नाही. कायद्यात काही पळवाटादेखील आहेत. नवीन कायद्यानुसार शेतमाल खरेदीविक्री व्यवहारात शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची शाश्वती दिसत नाही. बाजारात शेतमालाचे भाव पडले व व्यापाऱ्याने ठरल्या भावाने शेतकऱ्यांचा शेतमाल उचलण्यास नकार दिल्यास नवीन कायद्यात त्यावर उपयोजना दिसत नाही. महत्वाचे म्हणजे या कायद्यात हमीभावाचा कुठेही उल्लेख नाही.

शेतीमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार शेतकऱ्यांना आहे, पण या अधिकाराचा शेतकरी वापर कसा करेल याची स्पष्टता या कायद्यात दिसत नाही, या कायद्याने नवीन व्यवस्था उभी राहणार आहे. या सोबतच कृषी उत्पन्न बाजार समितीची जुनी व्यवस्था देखील समांतरपणे अस्तित्वात राहणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आणखी गोंधळ वाढण्याची शक्यता नाकारत येत नाही. व्यापाऱ्यांना ज्या व्यस्थेत जास्त

फायदा दिसेल तिकडे ते धावतील पण शेतकऱ्यांचे काय ? ते या दोन्ही व्यवस्थेच्या मध्ये भरडणार नाही याची भीती नाकारता येत नाही.

एपीएमसी ऍक्टनुसार शेतकऱ्यांना आपला शेतमाल कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट प्लेस) मध्येच विकणे बंधनकारक असते. एपीएमसी कायद्यानुसार व्यापारी व शेतकऱ्यांमध्ये खरेदी-विक्रीचा व्यवहार झाल्यानंतर जर का पुढे बाजारभाव पडले तरीदेखील या कायद्याने त्या व्यापाऱ्याला शेतकऱ्याच्या मालाची उचल करणे हे बंधनकारक असते. यामुळे या एपीएमसी ऍक्टमुळे शेतकऱ्यांना खरेदी-विक्री व्यवहार करतांना संरक्षण प्राप्त होते. या विधेयकात कृषी उत्पन्न बाजार समित्या (एपीएमसी) सुरू राहतील, असे म्हटले आहे; परंतु किमान हमी भावाने शेतकऱ्यांकडून शेतीमाल खरेदी करण्याचे धोरण सरकार सुरू ठेवेल, असे म्हटलेले नाही. हमी किमतीला शेतीमाल विकत घेण्याचे स्पष्ट आश्वासन विधेयकात नसेल, तर हमी भाव निरर्थक ठरतात.

**हमी भाव करार व कृषी सेवा विधेयक (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग):**

या कायद्या नुसार शेतकरी शेतमाल विक्री बाबत करार करू शकतो. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये कंपनी, उद्योजक, व्यापारी व इतर कोणीही शेतकाऱ्यांसोबत करार करून शेती करू शकतो. कॉन्ट्रॅक्ट हा शेतकऱ्यांच्या शेतीचा नसेल तर पिकाचा असणार आहे. कायद्यानुसार कोणत्या वाणाचे कोणते पीक घ्यायचे हे कॉन्ट्रॅक्टर शेतकऱ्यांना आधी सांगणार आहे. शेतकऱ्याला याचा किती भाव द्यायचा हे देखील कॉन्ट्रॅक्टर शेतकऱ्याला आधीच सांगणार आहे. एक मत झाले तर कॉन्ट्रॅक्ट अस्तित्वात येईल . कॉन्ट्रॅक्टमध्ये शेती खर्चाचे विवरण, इतर खर्चाचे विवरण नमूद असेल व ठरल्याप्रमाणे कॉन्ट्रॅक्ट अस्तित्वात येईल. या कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये शेतकऱ्यांसाठी अनेक सूट देण्यात आल्या.

शेतमाल विक्रीच्या वेळी कॉन्ट्रॅक्टपेक्षा बाजारभाव जास्त असला तर त्याचा वाढीव हिस्सा शेतकऱ्यांना मिळण्याची तरतूद या कायद्यात आहे. शेतकऱ्यांना कॉन्ट्रॅक्ट काळात कधीपण बाहेर पडण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये काही वाद निर्माण झाला तर शेतकऱ्यांना उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे दाद मागण्याचा पर्याय असणार आहे. उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना 20 दिवसांच्या आत असे प्रकरण निकाली काढणे बंधनकारक असणार आहे . दुसरी गोष्ट उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचा निकाल शेतकऱ्याचा विरोधात गेला तर दुसरीकडे दाद मागण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नाही. आपल्याकडे किती शेतकरी जागृत व सुशिक्षित आहे, ज्यांना काँट्रॅक्टचे बारकावे आणि अटी वेळेत लक्षात येतील? जगात कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगचे प्रयोग फसले असतांना

भारतासारख्या अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या देशात हा प्रयोग यशस्वी होईल का? कागदोपत्री एका रात्रीत तयार होणाऱ्या बोगस कंपन्यांना कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग पासून दूर ठेवण्याची तरतूद या कायद्यात नाही. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये शेतकऱ्यांचे पूर्णता हित जपले जाईल व शेतकऱ्यांवर दबाव तंत्राचा वापर होणार नाही या बाबत शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) हमीभाव करार व कृषी सेवा विधेयक (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) कायद्यात स्पष्टता नाही.

सध्या या कायद्याला जो विरोध होत आहे. तो विरोध हा या कायद्यातील त्रुटीमुळे होत आहे. पंजाब , हरियाणा व पश्चिम उत्तरप्रदेश या भागात शेतकरी या कायद्याला जोरदार विरोध करत आहे कारण पंजाब व हरियाणा राज्यात भारतीय खाद्य निगम मोठ्या प्रमाणात गहू व तांदूळाची खरेदी करते. नवीन कायद्याने एपीएमसी अडत व्यवस्था कोलमडली तर भविष्यात ही हक्काची व्यवस्था बंद होईल अशी भीती उत्तर भारतातील या शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे हे शेतकरी या नवीन कृषी सुधारणा कायद्यांना विरोध करत आहेत.

**अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) विधेयक:**

तिसरे अत्यावश्यक वस्तू(सुधारणा) विधेयक हे कृषीमाल साठवण मर्यादा कायद्या संदर्भात आहे. या नवीन कायद्यानुसार शेतमालाची साठवणूक करण्यासंदर्भात कोणतीही मर्यादा नसणार आहे. त्यामुळे उद्योजकांना या कायद्याच्या आधाराने कृषी व्यवसायात थेट प्रवेश मिळेल. उद्योजक व व्यापारी हे मोठा साठा करून नफेखोरीसाठी या कायद्याचा दुरुपयोग करू शकतात. कमी भावात शेतकऱ्याकडून शेतमाल खरेदी करायचा व भरमसाठ साठेबाजी करून नफेखोरीसाठी बाजारात शेतमालाचा तुटवडा निर्माण करायचा, असे व्यापाऱ्यांनी व उद्योजकांनी ठरवले तर यावर नियंत्रण कसे आणायचे याची स्पष्टता या नवीन अत्यावश्यक वस्तू(सुधारणा) विधेयक कायद्यात दिसत नाही. ही मोठी उणीव या कायद्यात दिसत आहे.

या तिन्ही नवीन कायद्याचे केंद्रबिंदू शेतकरी, व्यापारी, अडती(दलाल), ग्राहक व कॉन्ट्रॅक्टर आहे. या पाच घटकांवर या कायद्याचा परिणाम होणार आहे. यापैकी ग्राहक व व्यापारी यांच्यावर होणारा परिणाम शून्य किंवा नाममात्र असणार आहे. अडती(दलाल) या नवीन व्यवस्थेतील पळवाटेत स्वतःला समायोजित( ऍडजस्ट) करून घेईल. कॉन्ट्रॅक्टर हा या क्षेत्रातील नवीन वर्ग आहे. त्यामुळे त्यांच्यावर काय परिणाम होईल हे आज सांगता येणार नाही. शेवटचा घटक शेतकरी जो कायद्याच्या मध्यभागी आहे. तो मात्र या कायद्यापासून अनभिज्ञ आहे. त्याला या कायद्याने किती फायदा मिळेल हे त्यालाच माहीत नाही.

**संदर्भ:**


१. भारताचे राजपत्र सी.जी.डी.एल.अ-5062020-219745 असाधरण भाग-दोन खंड-1 ,27 सप्टेंबर 2020

२. https://agricoop.nic.in/

३. https://mr.wikipedia.org

४. कृषी सुधारणा विधेयकं : फायदे व तोटे टीम मॅक्स महाराष्ट्र.

५. रमेश जाधव , पुणे **साप्ताहिक साधना ३.१०.२०२०.** कृषी विधेयके : शेतकऱ्यांचे हित साधणार की माती करणार?